# <u>प्रसिध्दीपत्रक</u>

**महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा निम्नश्रेणी व उच्चश्रेणी परीक्षा रविवार, दिनांक २८ जून, २०२६ रोजी मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्रे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत खाली नमूद केलेल्या संबंधित विभागीय कार्यालयांकडे दिनांक २० मे, २०२६ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.**

| | |
|---|---|
| **मुंबई व कोकण विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>कोकण विभाग, कोकण भवन, तिसरा मजला,<br>नवी मुंबई - ४०० ६१४.<br>दूरध्वनी क्रमांक ०२२-२७५७३५४२. | **पुणे व नाशिक विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला,<br>पुणे - ४११ ००१.<br>दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२१७०९. |
| **नागपूर व अमरावती विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>प्रशासकीय इमारत,दुसरा मजला, सिव्हिल लाईन्स,<br>नागपूर - ४४० ००१.<br>दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६४९५६. | **छत्रपती संभाजीनगर विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर,<br>छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००१.<br>दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३६१३७२. |

**अराजपत्रित कर्मचारी व राजपत्रित अधिकाऱ्यांची माहे जून २०२६ मधील हिंदी भाषा निम्नश्रेणी परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र. १) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या सुधारित अभ्यासक्रमाचे इयत्ता १० वी साठी निश्चित केलेले "लोकभारती (<u>द्वितीय भाषा</u>)" या पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. हिंदी भाषा उच्चश्रेणी परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र. १) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचे इयत्ता १० वी साठी मार्च-एप्रिल, २०१८ मध्ये निश्चित केलेले "कुमारभारती (<u>प्रथम भाषा</u>)" या पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका क्र. २ च्या अभ्यासक्रमात कोणताही बदल नाही.**

**<u>परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी सदर आवेदनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव, कार्यालयाचा पूर्ण पत्ता, (पिन कोड क्रमांकासह) व भ्रमणध्वनी क्रमांकासह आवेदनपत्र परिपूर्ण भरून मूळ चलनासह संबंधित कार्यालयाकडे उपरोक्त नमूद केलेल्या तारखेपूर्वी पाठविणे आवश्यक आहे.</u>** भाषा संचालनालयाच्या **directorate.marathi.gov.in** या संकेतस्थळावर भाषा संचालनालयाच्या हिंदी भाषा परीक्षा व परीक्षा शुल्कासंबंधीची सर्व माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच सदर परीक्षांची कार्यक्रमपत्रिका व प्रवेशपत्र संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी प्रसिध्द करण्यात येईल.

(अरुण वा.गिते)
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०९ एप्रिल, २०२६.**